**L. A. BILL No. XI OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA NURSES ACT, 1966.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११.

**महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९६६ चा महा. ४०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, दिनांक १९ डिसेंबर २०२० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(शा.म.मु.) एचबी ४८३—१ (३४०——७-२०२१)

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ४० ची सुधारणा.

१९६६ चा महा. ४०.

**२.** महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ याच्या कलम ४० मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, राज्यात कोविड-१९ या सार्वत्रिक साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे, या पोट-कलमान्वये तरतूद केलेल्या वाढीव मुदतीत परिषद घटित केली जाऊ शकत नसेल तर, राज्य शासनास, आणखी एक वर्षाच्या मुदतीसाठी प्रशासकाच्या नियुक्तीची मुदत वाढविता येईल, परंतु ती एकूण तीन वर्षांहून अधिक असणार नाही.".

प्रशासकाने केलेल्या कृतींची व गोष्टींची विधिग्राह्यता.

१९६६ चा महा. ४०.

**३.** महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ याच्या कलम ४० च्या पोट-कलम (३) अन्वये नियुक्तीची वाढवलेली मुदत समाप्त झाल्यानंतर हा अधिनियम **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापर्यंत, प्रशासकाने केलेल्या सर्व कृती व गोष्टी आणि हाती घेतलेल्या सर्व उपाययोजना, जणू काही त्याच्या नियुक्तीची मुदत अशा प्रकारे समाप्त झाली नव्हती असे समजून वैधरीत्या केल्या असल्याचे किंवा हाती घेतलेल्या असल्याचे मानण्यात येईल; आणि ती कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद ठरवली जाणार नाही, किंवा, अशा प्रशासकाने, उक्त अधिनियमान्वये, अशा कालावधीत वापरलेले अधिकार, पार पाडलेली कर्तव्ये आणि केलेली कार्ये, कोणताही वैध प्राधिकार नसताना वापरले होते किंवा, पार पाडली होती किंवा केली होती केवळ एवढ्याच कारणावरून, अशा व्यक्तीच्या किंवा महाराष्ट्र परिचारिका परिषदेच्या विरोधात कोणताही दावा किंवा अन्य कार्यवाही सुरू करण्यात येणार नाही किंवा चालविली जाणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्यात, परिचारिकांची नोंदणी व प्रशिक्षण यांचे विनियमन करण्यासाठी एकात्म व अधिक चांगल्या तरतुदी करण्याकरिता महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ४०), अधिनियमित केला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ३ मध्ये, अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, त्यात विनिर्दिष्ट केलेले विवक्षित पदसिद्ध सदस्य, निवडून आलेले सदस्य आणि नामनिर्देशित सदस्य यांचा समावेश असलेली, महाराष्ट्र परिचर्या परिषद घटित व विधिसंस्थापित करण्याची तरतूद आहे.

२. महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) अधिनियम, २०१८ (२०१८ चा महा. ३३) द्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४० मध्ये, पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले असून त्यामध्ये अशी तरतूद आहे की, उक्त अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अध्यक्ष व उपाध्यक्षासह सदस्यांचा पदावधी समाप्त झाल्यानंतर किंवा, यथास्थिति, कलम ४ च्या उक्त पोट-कलम (२) च्या पहिल्या परंतुकाअन्वये त्यांना दिलेल्या मुदतवाढीचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, जर कोणत्याही कारणास्तव परिषद घटित करता येऊ शकली नसेल तर, राज्य शासनास, उक्त अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये परिषदेला प्रदान केलेल्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिच्याकडे सोपविलेली सर्व कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी सुरुवातीला एक वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता आणि त्यानंतर अशा आणखी कालावधीकरिता किंवा कालावधींकरिता प्रशासक किंवा प्रशासक मंडळ नेमता येईल, जेणेकरून त्याचा असा एकूण कालावधी, दोन वर्षांहून अधिक असणार नाही.

उक्त पोट-कलम (३) अन्वये, राज्य शासनाने, शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, क्रमांक न्याय प्र-२०११/प्र.क्र.९२/अधिनियम, दिनांक १९ डिसेंबर २०१८ अन्वये, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये परिषदेला प्रदान केलेल्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिच्याकडे सोपविलेली सर्व कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून तत्कालीन सह संचालक आणि आताचे प्रभारी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांची नियुक्ती केली आहे.

संसदेच्या व महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या निवडणुकींसाठी आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी केल्यामुळे, महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) अधिनियम, २०२० (२०२० चा महा. १३) द्वारे उक्त परिषदेची पुनर्रचना केल्यामुळे, मार्च २०२० पासून कोविड-१९ सार्वत्रिक साथरोगामुळे केलेली टाळेबंदी यांमुळे आणि संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, जो उक्त परिषदेचा प्रशासक म्हणून देखील कार्य करीत होता, यांची, शासकीय अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, दिनांक १४ मार्च २०२० द्वारे, कोविड-१९ सार्वत्रिक साथरोगाच्या नियंत्रणाच्या प्रयोजनासाठी, साथरोग अधिनियम, १८९७ (१८९७ चा ३) याच्या तरतुदी अन्वये सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती केल्यामुळे, परिषदेच्या निवडणुका वेळेत घेता येऊ शकल्या नाहीत.

जर, प्रशासकाच्या किंवा प्रशासक मंडळाच्या दोन वर्षांच्या पदावधीमध्ये परिषद घटित करता येऊ शकली नाही तर दोन वर्षानंतर, उक्त कलम ४० च्या पोट-कलम (३) अन्वये नियुक्त केलेल्या प्रशासकाची किंवा प्रशासक मंडळाची मुदत वाढविण्यासाठी राज्य शासनाला सहाय्यभूत होणारी कोणतीही तरतूद उक्त अधिनियमात नाही.

३. म्हणून, कलम ४० च्या पोट-कलम (३) मध्ये, राज्यातील कोविड-१९ सार्वत्रिक साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे या पोट-कलमाअन्वये तरतूद केलेल्या वाढीव मुदतीत परिषद घटित केली जाऊ शकत नसेल तर, राज्य शासनास आणखी एक वर्षाच्या मुदतीसाठी प्रशासकाच्या नियुक्तीची मुदत वाढवता येईल, परंतु ती एकूण तीन वर्षांहून अधिक असणार नाही, असे परंतुक जादा दाखल करणे इष्ट वाटते.

४. अशा रितीने प्रशासक म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्तीने, उक्त अधिनियमाच्या कलम ४० च्या पोट-कलम (३) अन्वये नियुक्तीची वाढविलेली मुदत संपल्याच्या दिनांकापासून हा अधिनियम **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापर्यंत केलेल्या सर्व कृती किंवा गोष्टी आणि हाती घेतलेल्या उपाययोजना, विधिग्राह्य करण्याचे देखील प्रस्तावित केले आहे.

५. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई, **अमित देशमुख,**
दिनांक ३० जून, २०२१. वैद्यकीय शिक्षण मंत्री.

## सन २०२१ चे वि.स. विधेयक क्रमांक ११-महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०२१ याचे परिशिष्ट

### (महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ यातील उतारे)

### (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०.)

**१.** ते **३९.** * * * *

**४०.** (१) आणि (२) * * * *

(३) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अध्यक्ष व उपाध्यक्षासह सदस्यांचा पदावधी समाप्त झाल्यानंतर किंवा, यथास्थिति, कलम ४ च्या उक्त पोट-कलम (२) च्या पहिल्या परंतुकाअन्वये त्यांना दिलेल्या मुदतवाढीचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, जर कोणत्याही कारणास्तव परिषद घटित करता येऊ शकली नसेल तर, शासनास, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये परिषदेला प्रदान केलेल्या सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिच्याकडे सोपविलेली सर्व कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी सुरूवातीला एक वर्षापेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता आणि त्यानंतर आणखी अशा कालावधीकरिता किंवा कालावधींकरिता प्रशासक किंवा प्रशासक मंडळ नेमता येईल, मात्र त्याचा असा एकूण कालावधी हा दोन वर्षांहून अधिक होणार नाही. राज्य शासनाचे नियंत्रण.

**४१.** ते **४५.** * * * *

**अनुसूची.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११.]**

**[ महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. अमित देशमुख,**
वैद्यकीय शिक्षण मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.